नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०१/२०२६ ( शनिवार )

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात येत आहे 'रेझिंग डे' सप्ताह

२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, **दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.** आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे रेझिंग डे' विविध उपक्रम घेवुन साजरा करण्यात आला.

### पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत राष्ट्रीय आदर्श महाविदयाल,रामटेक येथे तसेच पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत हरीहर महाविदयालय येथे महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त (रेझिंग डे) नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन नागरिक व विद्यार्थ्यांना पोलीस दलाच्या विविध विभागांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने साजरे करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमात पोलीस बँड पथकाने आकर्षक वादन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.सदर कार्यक्रमात श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्यासह संबधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

### विदयार्थ्यांची पोलीस स्टेशनला भेट

पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे बालाजी ज्युनियर कॉलेज बुटीबोरी चे विदयार्थ्यांना,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे न्यु ड्रीम स्कुल गणेशपुर चे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन बेला येथे लोकजीवन विदयालय चे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन अरोली येथे इंडीयन पब्लीक स्कुल चे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे प्रताप शाळेचे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन देवलापार येथे स्वामी विवेकानंद विदयालय चे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन मौदा येथे शिर्डी

साई स्कुल चे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन केळवद येथे भिखुलाल चांडक शाळेचे विदयार्थ्यांना पोलीस स्टेशनला आमंत्रिम केले होते. कार्यक्रमास विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. त्यांना पोलीस स्टेशन मधील विविधी शस्त्रे दाखवुन त्या विषयी माहिति देण्यात आली. पोलीस स्टेशन अंतर्गत विविध विभागांमध्ये चालणारे कामकाजाबद्दल माहीती देण्यात आली. त्याचबरोबर **गुन्हेविरोधी जागरूकता, सोशल मिडीया चा सुरक्षीत वापर सायबर गुन्हे, गुड टच बॅड टच, रस्ते सुरक्षाबाबत, डायल ११२ बाबत माहीती देण्यात आली.** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी मारूती सुझुकी कंपनीतील कामगारांना पोलीस विभागाची कार्यपद्धती समजावून सांगितली तसेच सुरक्षा,सायबर सुरक्षा, बाबत माहिति दिली.

### जिल्हा वाहतुक शाखा, नागपूर ग्रामीण कडुन घेण्यात आलेले कार्यक्रम

जिल्हा वाहतुक शाखा ,नागपुर ग्रामीण यांनी पोस्टे मौदा अंतर्गत गांधी विद्यालय, वडोदा येथे ,. पोस्टे सावनेर अंतर्गत सावनेर पब्लीक स्कुल, सारस्वत पब्लीक स्कुल, मॉर्नींग स्टार स्कुल येथे, पोस्टे रामटेक अंतर्गत साई इंटरनॅशनल स्कुल येथे, पोस्टे कुही अंतर्गत तरूण डिफेन्स पब्लीक स्कुल डोंगरगाव येथे भेट देवुन विद्यार्थ्यांना रेझिंग डे निमित्त वाहतूक नियमन, वाहतूक कारवाई तसेच रस्ते सुरक्षा बाबत माहिति दिली.सदर कार्यक्रमात संबधीत पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार सुध्दा उपस्थित होते.




पोलीस स्टेशन अरोली


महाराष्ट्र पोलीस
स्थापना दिवस
सप्ताह सोहळा व जनजागृती कार्यक्रम
पोलीस स्टेशन, MIDC बुटीबोरी
(नागपूर जिल्हा ग्रामीण)
MAHARASHTRA POLICE
RAISING DAY
Week Celebration & Awareness
Program-2026


स्थापना सन : 1989
पोलीस स्टेशन बुटीबोरी
नागपूर ग्रामिण
WIRES & CABLES


realme
Shot on realme 10 Pro+ 5G 108MP
2026 01 03 14:06


देवलापार
महाराष्ट्र पोलीस
वर्धापन दिवस सप्ताह
२ जानेवारी ते ८ जानेवारी






FIRST FLOOR AREA
3 Causes of Accidents
I didn't listen
SAFETY GALLERY
रस्ता सुरक्षा अभियान-२०२६
स्थापना दिवस
MAHARASHTRA POLICE RAISING DAY
MARUTI SUZUKI INDIA LTD.
EXIT

# अवैधरित्या अंमली पदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या अरोपीतांवर गुन्हा नोंद, आरोपी अटक नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोस्टे पारशिवणी** :—दिनांक ०२/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत मनसर ते पारशिवनी असे जात असतांना **आरोपी शांताराम फुलसिंग कुंभरे वय. ६० वर्षे रा. डोला माईन्स पोस्ट , मनसर ता. रामटेक, जि.नागपुर** हा त्याचे रहाते घरासमोरील रोडवर त्याचे हातात कापडी पिशवी घेवुन उभा असतांना पोलीस वाहन पाहुन आडोशास लपुन गेल्याने , त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याची पंचासमक्ष झडती घेता त्याच्या हातातील पिशवीत ३२४ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. नमुद आरोपीला ताब्यात घेवुन त्याची कसुन चौकशी केली असता आरोपी क्रं २ **विशाल चिंचोलकर, रा. धरम नगर ,कन्हान, ता.पारशिवनी याने** सदर गांजा विक्री कामी दिला असल्याचे त्याने सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा वजन ३२४ ग्रॅम , ०२ चिलम असा एकुण कि. ६६०० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी दोन्ही आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्रं १ याला अटक करण्यात आली आहे.




## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

सावनेर पोलीसांना दि. ०२/०१/२०२६ चे रात्री ०१/४५ वा डायल ११२ वर माहीती प्राप्त झाली की, बोरगाव शिवार कळमेश्वर सावनेर हायवेवर एक कार पलटी झाली आहे. अशी माहीती प्राप्त होताच सावनेर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी स्कॉर्पिओ वाहन क्रमांक एम एच ०४ एच एक्स ७३३८ ही पलटी झालेली होती. त्याखाली एक इसम दबलेला होता. पोलीसांनी तात्काळ सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने नमुद वाहन वर उचलुन सदर इसमाला बाहेर काढुन ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे दाखल केले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्याला मृत घोषीत केले.सदर वाहन धापेवाडा येथुन सावनेर मार्गे कळमेश्वर कडे जात असतांना सदर अपघात झाला. सदर अपघातात **निखील रविंद्र गुडधे, वय २३ वर्ष, रा. नब्बे कॉर्टर, गडा, जबलपुर हे मरण पावले असुन चालकासह ८ इसम जखमी झाले आहे. वाहन**

**चालक आरोपी नामे  कुणाल ईश्वर घोडमारे, वय ३२ वर्षे, रा. नागपुर याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुध्दा त्याने त्याच्या ताब्यातील स्कॉर्पिओ कार दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर वाहन पलटी होवुन एकाचा मृत्यु आणि इतर इसम जखमी झाले.**

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर  येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, १०६(१), १२५(ए), १२५(बी), २८१ भान्यासं २०२३ सहकलम १८४, १८५ मोटर वाहन अन्वये गुन्हा नोंद केला  आहे.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मदयपान करून वाहन चालवु नका, स्वत:चा आणि दुसऱ्यांचा जीव धोकयात घालु नका.अन्यथा कठोर कायदेशिर कारवाई ला समोर जावे लागेल.**

## पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील भिष्णुर गावात पोलीसांनी अवैध दारू विक्रेत्यांवर केलेल्या प्रभावी कारवाई बाबत..

**दिनांक ३१ /१२/ २०२५ रोजी एका वृत्तपत्रात दारूबंदीसाठी महीलांचा एल्गार या शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. त्या बाबत सविस्तर माहीती अशी आहे की, गावात पुर्णपणे दारूबंदी व्हावी यासाठी  गावकऱ्यांकडुन ग्रामसभेत ठराव घेण्यात आलेला आहे. त्याबाबत संबधीत विभाग कारवाई करीत आहे.**

**याव्यतिरिक्त भिष्णुर गावात अवैध दारू विक्रेत्यांवर जलालखेडा पोलीसांकडुन वारंवार कारवाया करण्यात आल्या आहे. तसेच मागील काही वर्षाचा अवैध दारू विकेत्याचां अभिलेख पडताळुन त्यांच्यावर  पोलीस विभागाकडुन प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे. तसेच**

**एका सराईत दारू विक्रेत्या आरोपीला हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीस विभागाकडुन उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांच्या कडे सादर करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक ०२/०१/२०२६ रोजी सावनेर पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कोलार नदी पात्र पाटणसांवगी येथे अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता John Deere ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी एच ७०१५ आणि त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली मिळुन आली. वाहन चालक आरोपी नामे सुरज दिलीप मरसकोल्हे, वय २४ वर्षे, रा. वानखडे शिवाजी चौक पाटणसावंगी ता. सावनेर आणि वाहन मालक आरोपी क्रं २. स्वप्नील रविंद्र सोनसरे, वय २८ वर्ष, रा. वार्ड न. ५ पाटणसावंगी सावनेर यांनी पोलीसांना येताना पाहुन वाहनातील रेती तिथेच खाली केली. आरोपीतांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे परवाना नव्हता. पोलीसांनी पंचासमक्ष John Deere ट्रॅक्टर क्र. एम एच ४० सी एच ७०१५ आणि त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली ३,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३(२) भा.न्या. सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७२४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३५आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३० आरोपी अशा एकुण १६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



## रात्रगस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०२/०१/२०२६ चे २३:०० वा. ते दिनांक ०३/०१/२०२६ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत आणि पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन

राबविण्यात आले. नाकाबंदी करून नाकाबंदी दरम्यान वाहने तपासण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने